प्रति,

मा. सहा.पोलीस आयुक्त सो.

जनसंपर्क अधिकारी पुणे शहर.

यांना सविनय सादर,

रिपोर्ट :- एस.एम.क्षिरसागर म.पोलीस उप-निरीक्षक स्वारगेट पोलीस ठाणे पुणे.

यांजकडून विनंती पुर्वक की

विषय :- बेवारस मयत पुरुषाचे नातेवाईकांचा व अनोळखी पिकअप गाडीचा तपास होणेबाबत.

महोदय

उपरोक्त विषयान्वये सविनय सादर की स्वारगेट पोलीस ठाणे गु.र.न.२३९/२०१८ भा.द.वि.कलम ३०४(अ),२७९,मो.वा.कायदा कलम १८४,११९/१७७,१३२(१)(अ) मधील मयत एक अनोळखी बेवारस पुरुष वय अंदाजे ६० वर्षे त्याचे अंगामध्ये पिवळ्या रंगाचा बरमुडा व पांढऱ्या रंगाचा मळकट शर्ट घातलेला त्या इसमास दि.२५/०६/२०१८ रोजी पहाटे ०५/२८ वा.चे सुमारास नानुमल हॉटेल समोर टिळक रोड जेधे चौकाच्या पश्चिमेस हिराबागकडून स्वारगेटच्या दिशेने येणाऱ्या पांढऱ्या रंगाच्या नंबर माहीत नाही पिकअप गाडीवरील चालकाने आपली गाडी हयगईने अविचाराने भरधाव वेगाने येवुन नानुमल हॉटेल समोर उभ्या असलेल्या वरील वर्णनाच्या इसमास धडक देवून गंभीर जखमी करुन त्याचे मृत्यूस कारणीभुत होवून अपघातस्थळी न थांबता अथवा पोलीसांना खबर न देता पळुन गेला आहे.त्यातील मयत इसमाचे वर्णन खालील प्रमाणे.

एक अनोळखी पुरुष वय अंदाजे ६० वर्षे रंगाने निमगोरा उंची ५ फुट ५ इंच पांढऱ्या रंगाची खुरटी दाढी,डोकीचे केस वाढलेले काळे पांढरे नाक सरळ अंगाने मध्यम वेडसर असलेला नेसणीस पिवळ्या रंगाचा बरमुडा व अंगात मळकट पांढऱ्या लाईन असलेले शर्ट सोबत फोटो जोडलेला आहे.

येणेप्रमाणे वरील वर्णनाच्या मयताच्या नातेवाईकांचा व अनोळखी पिकअप गाडीचा तपास कामी सर्व वर्तमान पत्रात माहीती प्रसिध्द होणेस विनंती आहे.